Dr. Choudhari

# SARASWATI
## The Research Journal

Special Issue
Global and Internal Politics: Issues and Areas

SBES College of Arts and Commerce,
Aurangabad, Maharashtra

# Internal and Global Politics : Issues and Areas

**Special Issue Editor**
**Dr. Navnath Aghav**
Professor and Head
Department of Political Science

**SBES College of Arts and Commerce,**
**Aurangabad, Maharashtra**

# अनुक्रमणिका


| अ.क. | पेपरचे नाव | लेखकाचे नाव | पृष्ठ |
|---|---|---|---|
| 1. | संपादकीय | | viii |
| 2. | ग्रामीण विकासात स्थानिक स्वशासनाची भूमिका | भाग्यश्री दौड | 01 |
| 3. | केंद्र-राज्य संबंध | डॉ.कादरी सय्यद मुजतबा | 06 |
| 4. | निवडणुक आयोगाची भूमिका | उज़मा ऐनोद्दीन सिद्दीकी | 08 |
| 5. | केंद्र आणि राज्यसंबंध | कैलास अवसरमोल | 12 |
| 6. | केंद्र- राज्य संबंध व तणाव निर्माण करणारे घटक | डॉ.सुनिल पिंपळे | 17 |
| 7. | कलम ३७० व ३५ (A) आणि भारतीय राजकारण | प्रा.मुंडे एस.एम. | 21 |
| 8. | भारतीय राज्यघटनेतील न्यायालयीन सक्रियतेचे योगदान | डॉ.अण्णासाहेब हरदारे | 24 |
| 9. | केंद्र-राज्य संबंधाचे बदलते स्वरूप | डॉ.अतुल खोसे | 30 |
| 10. | कलम ३७० व ३५ अ निर्मुलन | डॉ.रामकिशन लोमटे | 34 |
| 11. | भारतीय लोकशाही शासन व्यवस्थेत राज्यपालाची भूमिका | दळवे बालाजी | 38 |
| 12. | कोरोना काळात महिलांवरील अत्याचार: उपाययोजना | डॉ.विश्वनाथ आवड | 41 |
| 13. | केंद्र-राज्य संबंधातील वाढता तणाव | डॉ.रमाकांत तिडके | 46 |
| 14. | Abolition of 370 & 35A | आबासाहेब हर्षे | 51 |
| 15. | लोकशाही शासन : आघाडी शासनाची अपरिहार्यता | डॉ.राजू वनारसे<br>डॉ.सत्यपाल कांबळे | 59 |
| 16. | केंद्र-राज्य संबंध:एक समीक्षात्मक अभ्यास | डॉ.विनोद आचार्य | 64 |
| 17. | एक भारत श्रेष्ठ भारत | डॉ.माधव चोले | 68 |
| 18. | राज्यपालांची भूमिका | परवीन यादव | 74 |
| 19. | महाराष्ट्रातील बदलते राजकारण | बाळासाहेब नलावडे | 80 |
| 20. | कोविड-१९ : मिडिया आणि राजकारण | प्रा.हिवाळे लक्ष्मण | 83 |
| 21. | राज्यपालाची भूमिका | प्रा.भिमराव खरात | 87 |
| 22. | कलम 370 आणि 35 अ | डॉ.एन.बी.आघाव | 90 |
| 23. | केंद्र-राज्य संबंधाचे बदलते आयाम | डॉ.माधव कदम | 93 |
| 24. | राज्यपाल : घटनात्मक अपेक्षा आणि वास्तव | डॉ.माधव कदम | 97 |

| | | | |
|---|---|---|---|
| 25. | भारतीय लोकशाहीच्या बळकटीकरणात निवडणुक आयोगाची भूमीका | डॉ.रामदास निहाळ | 100 |
| 26. | केंद्र व घटक राज्य यांच्यातील प्रशासकीय आणि आर्थिक सबंध | प्रा.जोगदंड बळीराम | 105 |
| 27. | भारतातील प्रादेशिक पक्ष व समकालीन राजकारण | डॉ.ए.पी.वनारसे | 109 |
| 28. | कलम ३५६ आणि राज्यपालाची वादग्रस्त भूमिका | डॉ.राजेंद्र शिंदे | 118 |
| 29. | Regional Political Parties and Contemporary Politics | डॉ.नितीन आहेर | 124 |
| 30. | नागरिकत्व सुधारणा कायदा 2019 | डॉ.चौधरी के.पी.<br>डॉ.तांदळे डी.आर. | 132 |
| 31. | भारतातील केंद्र - राज्य संबंधाचे स्वरुप व तरतुदी | डॉ.नामानंद साठे | 139 |
| 32. | भारतीय राजकारणातील केंद्र-राज्य संबंध एक अभ्यास | डॉ.महादेव मुंडे | 144 |
| 33. | कोरोना, सरकार आणि न्यायालयाची सक्रियता | डॉ.प्रभाकर जाधव | 151 |
| 34. | नागरिकत्व सुधारणा कायद्याचे राजकीयीकरण | प्रा.एकनाथ खरात | 156 |
| 35. | Covid-19 चे सामाजिक,आर्थिक व राजकीय जीवनावरील परिणाम | डॉ.अंबादास बिराजदार | 163 |
| 36. | प्रमुख आणि प्रादेशिक शक्तींशी भारताचा संबंध | डॉ.महेश मोटे | 167 |
| 37. | केंद्र-राज्य संबंध | डॉ.व्यंकटेश खरात | 173 |
| 38. | भारतीय नागरीकत्व कायदा | छाया सवडतकर | 176 |
| 39. | नागरिकत्व दुरुस्ती कायदा | डॉ.जगदीश देशमुख | 180 |
| 40. | 1989 नंतर राज्यपालपद आणि कलम 356 च्या वापराचा केंद्र-राज्य संबंधावरील प्रभाव | डॉ.ढोबळे डी.बी. | 185 |
| 41. | घटकराज्य कारभारात राज्यपालांची भूमीका | डॉ.गालफाडे ए.बी. | 194 |
| 42. | न्यायालयीन सक्रियता | डॉ.शिवाजी दिवाण | 199 |
| 43. | भारतीय राजकारणाचे बदलते स्वरूप आणि निवडणूक आयोग | विलास टाले | 205 |
| 44. | कोरोनी काळातील वाढती न्यायालयीन सक्रियता | डॉ.सुपेकर वैशाली | 211 |
| 45. | भारतीय मतदारांच्या वर्तनावरील प्रभाव | डॉ.निलेश शेरे | 214 |
| 46. | राज्यपालाची भूमिका | संदीप चौधरी | 219 |
| 47. | न्यायालयीन सक्रियता | प्रा.साईचरण पेंडकर | 226 |
| 48. | न्यायालयीन सक्रियतेचा विश्लेषणात्मक अभ्यास | डॉ.मलदोडे रामराव | 229 |
| 49. | Covid 19 and Global political Economy | R. V. Mhaske | 234 |
| 50. | निवडणुक आयोगाची भूमिका | उज़मा ऐनोद्दीन सिद्दीकी | 237 |
| 51. | केंद्र आणि राज्य संबंध | ज्योती दराडे | 241 |

| | | | |
|---|---|---|---|
| 52. | निवडणूक आयोगाची भूमिका | ज्योती दराडे | 247 |
| 53. | राज्यपालाच्या भूमिका | ज्योती दराडे | 250 |
| 54. | केंद्र-राज्य संबंधाचा आढावा | डॉ.देविदास नरवडे | 255 |
| 55. | न्यायालयीन सक्रियता | तडवी गुलाब | 260 |
| 56. | भारतीय महिलांवरील अत्याचार आणि न्यायव्यवस्था | प्रा.राजेश कांबळे | 262 |
| 57. | निवडणूक आयोगाची भूमिका | डोंबे उध्दवराव | 266 |
| 58. | केंद्र-राज्य संबंध | डॉ.आघाव एन.बी<br>किशोर बांबर्डे | 270 |
| 59. | केंद्र-राज्य संबंध | डॉ.दिनेश हंगे | 275 |
| 60. | स्थानिक राजकीय अभिजनांची राजकीय पक्षाचा प्रचार व प्रसार करण्याची पध्दती व जनतेचे राजकीय सामाजिकरण | महेंद्र तोंडे | 279 |
| 61. | राज्यपालांची भूमिका | रुकसाना शेख | 284 |
| 62. | भारतीय लोकशाहीत राज्यपालाची भूमिका | डॉ.आघाव एन.बी.<br>गणेश बनसोडे | 287 |
| 63. | समान नागरी कायदा:घटनात्मक वैधता आणि आवश्यकता | रुकसाना शेख | 292 |
| 64. | केंद्र-राज्य संबंधाबाबतचा बदलता दृष्टीकोन : एक अभ्यास | प्रा.पवार थावरा | 299 |
| 65. | कोविड -१९. प्रसारमाध्यम आणि राजकारण | डॉ.आर.बी. वनारसे<br>दत्तात्रय जाधव | 303 |
| 66. | राज्यपाल : कार्य एवं भूमिका | डॉ.सुभाष पोटभरे | 309 |
| 67. | निर्वाचन आयोग की भूमिका | रमाकांत | 314 |
| 68. | Role of Election Commission | Dr.Aghav N.B.<br>Kamble Kusum | 319 |
| 69. | Political Representation and Participation of Banjara Community in Politics of India | Dr.Tanmay Paithankar<br>Gorakh Rathod | 324 |
| 70. | Parliamentary Acts and Politics: New Agricultural Laws via Shahbano Case | Sonwalkar Ramesh | 328 |
| 71. | Regional Parties and Contemporary Politics in India. | Dr.Faruqui Mohammed Quayyum Younus | 335 |
| 72. | Role of Election commission in India | Shaikh Gafoor Ahmed | 339 |
| 73. | Judicial Activism and Indian Politics | Rajesh Gaikwad | 346 |
| 74. | Judicial Activism | Dr.Amreen Sultana<br>Mohd. Khalil | 349 |
| 75. | The Role of Regional Political Parties in Coalition Politics. (Special Reference Maharashtra State) | Dr.Pokale K.G. | 352 |

| | | | |
|---|---|---|---|
| 76. | Regional parties and contemporary politics in Maharashtra: with special reference of Nationalist Congress Party | Dr.Kadam H.P. | 355 |
| 77. | Regional politics and the Naxalite movement | Dr.Gokul Mundhe | 359 |
| 78. | Impact of COVID-19 on Higher Education in Maharashtra | Dr.Kishor Kale | 363 |
| 79. | Judicial Activism | Waghmare N.S. | 366 |
| 80. | Covid - 19 Media and Politics | Dr.Shantaram Chavan | 370 |
| 81. | Social media during covid-19 pandemic and its impact on Indian politics | Nikhil Borkar | 376 |
| 82. | भारत आणि सार्क | प्रा. अरुण राख | 379 |
| 83. | इंडो-पॅसिफीक प्रदेश चीन आणि क्वाड | नागरगोजे प्रदीपकुमार | 385 |
| 84. | अमेरिकेला अफगाणिस्तानमधुन सैन्य माघार घेण्याच्या घोषणेवर पुर्नविचार करण्याची आवश्यकता | डॉ.दिनकर कळंबे<br>विश्वास तळेकर | 390 |
| 85. | भारतीय राजकारणातील कलम ३७० व कलम ३५ मधील सुधारणा -एक अभ्यास | डॉ.सूर्यकांत सांभाळकर | 395 |
| 86. | भारत-चीन संबंधाचे बदलते स्वरूप आणि भारताची आत्मनिर्भर योजना | डॉ.पंडित नलावडे | 399 |
| 87. | कोविड 19 काळातील आंतरराष्ट्रीय राजकारण व भारताची भूमिका | डॉ.विजय तुंटे<br>रवींद्र माळी | 405 |
| 88. | कोविड-19 आणि चीन | डॉ.मोराळे सुहास<br>गीता गाडेकर | 412 |
| 89. | इस्त्रायल–पॅलेस्टीनी संघर्ष आणि भारत | डॉ.मानवते हुसनाजी | 415 |
| 90. | कोव्हीड 19 आणि जागतिक अर्थव्यवस्था | आशाताई बिरादार | 419 |
| 91. | Dynamic Shifts In India's Foreign Policy And India's Role As Acting Partner In Some International Organizations | Jyoti Soni | 422 |
| 92. | Indo-Pacific Region, China And Quad | Dr.Tanmay Paithankar | 429 |
| 93. | India's Foreign Policy-Issues And Challenges Amid Covid-19 Pandemic | Ansari Zartab Jabeen | 433 |
| 94. | Hobbes's State Of Nature & Post-Us Withdrawal From Afghanistan: Emerging Crisis And Challenges | Soumalya Ghosh | 438 |
| 95. | China's One Belt One Road: Indian Perspective | Dhiraj Kumar | 444 |
| 96. | Indo-Pacific: Opportunties And Challenges For India | Dr.Pardeep Kumar | 449 |
| 97. | The QUAD Factor in the Indo-Pacific Region and the Role of India | Dr.Munde S. E. | 456 |
| 98. | Impact of Globalization on Developing Countries | Dr.Kale Ravindra | 460 |
| 99. | The Globalization of Terrorism: Especially reference to India | Dr.Sham Kadam | 463 |

| | | | |
|---|---|---|---|
| 101. | COVID-19 And India's Foreign Policy | Dr. Vandana Mahure | 470 |
| 102. | Covid – 19 & India's Foreign Policy | Dr.Vinay Raut | 474 |
| 103. | Internal And Global Politics : Issues And Areas Covid 19 And Global Political Economy | Dr.Megha Pathak | 477 |
| 104. | Impact of COVID-19 on Global Environmentalism | Dr.R. K. Kale | 483 |
| 105. | Covid - 19 from a physical illness to a social illness | Prof. Riteshkumar Patel | 487 |
| 106. | India's Strategic Foreign policy: Balancing USA and Russia | Prof. T. A. Inamdar | 490 |
| 107. | India-ASEAN Relations: An Approach for Free and Open Indo-Pacific | Dr.Tanmay Paithankar Aniket Shinde | 496 |

# नागरिकत्व सुधारणा कायदा 2019

डॉ.चौधरी के.पी. डॉ.तांदळे डी. आर.

**प्रस्तावना :**

8 जोनवारी 2019 रोजी भारतीय संसदेने नागरिकत्व सुधारणा कायदा सहमत केला आहे. लोकांना आपापल्या देशात मिळालेला राजकीय दर्जा म्हणजे नागरिकत्व असे स्थूलमानाने म्हणता येईल. नागरिक म्हणजे नगराचा रहिवासी. प्राचीन काळी एकेका शहरापुरती शासनसंस्था, मर्यादित असायची. म्हणून शहराचा रहिवासी तो शासन संस्थेचा सभासद किंवा घटक मानला जायचा.

**नागरिकत्व कायद्याचा इतिहास :**

पुढे शासन संस्थेचे क्षेत्र मोठ्या प्रदेशावर पसरले. लहानमोठ्या प्रदशांतील समाजाला देश ही संज्ञा प्राप्त झाली. एका देशाने किंवा शासनसंस्थेच्या अधिकारक्षेत्रात राहणारे ते सगळे त्याचे नागरिक मानले जाऊल लागले. आधुनिक काळात नागरिकत्व म्हणजे शासनसंस्थेचे सदस्यत्व आणि नागरिक म्हणून असलेले हक्क व जबाबदाऱ्या यांचा समुच्चय असे म्हणता येईल.

नागरिकत्व ही संकल्पना कायदेशीर आहे आणि तिचा राजकीय व नैतिक अधिष्ठान आहे. शासनसंस्था ही नागरिकांची बनलेली असते. विशिष्ट भूप्रदेशात राहणाऱ्या समुदायाचे राजकीय संघटन म्हणजे शासनसंस्था या संघटनेचा उद्देश समाजाचे स्थैर्य, स्वास्थ्य आणि सातत्य टिकविणे व त्याआधारे व्यक्तीच्या विकासाला अवसर मिळेल अशी चौकट व वातावरण निर्माण करणे हे आहे.

प्रत्येक व्यक्तीचे तसेच सर्वांचे सामूहिक कल्याण साधता यावे या दृष्टीने समाज व्यवहारांचे नियमन करणे व परकीय आक्रमणापासून संरक्षण करणे हे शासनसंस्थेचे कर्तव्य होय. ते नीट पार पडायचे, तर नागरिकांनी शासन संस्थेचे नियम पाळले पाहिजेत व तिचा कारभार चालविण्यातील आपला वाटा उचलला पाहिजे. शासन संस्थेचा उद्देश व्यक्तिमत्वाच्या व एकंदर मानव जातीच्या हिताचा असल्याने तिचे सभासदत्व केवळ अपरिहार्यच नव्हे, तर श्रेयस्कर आहे. म्हणून नागरिकत्व ही संकल्पना संस्कृतिसंवर्धनाला उपकारक व पोषक ठरणारी आहे.

मानव समाज सामाजिकदृष्ट्या संघटित होऊ लागण्यापुर्वीच्या अवस्थेशी तुलना केली म्हणजे नागरिकत्वाची ही सांस्कृतिक बाजू स्पष्ट होईल. आदिम मानव जंगले व श्वापदे यांत अलग अलग राहत असे. मोठा मासा लहान माशाला गिळतो, तसाच न्याय आदिम माणसामाणसांतही चालायचा. यावरुनच 'जंगलाचा कायदा' हा वाक्यप्रचार रुढ झाला.

अशा स्थितीत माणसाला सुरक्षितता वाटणे व स्वत:च्या अंगच्या शक्तीचा व गुणांचा विकास करुण घेणे अशक्य होते. हळुहळु ही अवस्था काहीशी आपातात तर काही अंशी माणसाच्या जाणीवपुर्वक प्रयत्नांनी बदलली. शासनसंस्था विकसित झाली. राजेशाहीत राजा व प्रजा यांच्यातील नाते सत्ताधारी आणि त्यांचे आज्ञाधारक सेवक या प्रकारचे होते. पुढे मात्र प्रजाजन हे नागरिक आहेत व त्यांचाच शासनावर काहीएक अधिकार आहे. ही कल्पना रुढ झाली. आधुनिक काळात शासनसंस्थेबरोबरच नागरिकत्व आले. प्रत्येक माणसाने आपले स्वत:चे काम



Saraswati- The Research Journal, Special Issue (1) 2020-21, ISSN 2229 - 5224

करीत करीत शासनसंस्था घटक या नात्याने येणाऱ्या जाबाबदाऱ्या पार पाडायची पद्धत वाढू लागली. त्यामुळे सांस्कृतिक जीवन विकसीत झाले. विद्या व कला यांचा विकास झाला. नागरिकत्वाचा पाया अशा प्रकारे नैतिक व सांस्कृतिक असला, तरी तिची जातकुळी राजकीय आहे. नागरिक हा समाजातील एक व्यक्ती किंवा अर्थव्यवहारात उत्पादक, उपभोक्ता या नात्याने भाग घेणारा असला, तरी त्याचे नागरिकत्व हे शासनसंस्थेशी म्हणजेच समाजाच्या राजकीय संघटनेशी निगडीत आहे. व्यक्ती जन्मल्याबरोबर ती नागरिक बनते. नागरिकत्वाचे हक्क तिला मिळतात व त्याचप्रमाणे काही जबाबदाऱ्याही तीवर येऊन पडतात.

शासन संस्थेचा विकास होत गेला. तशी नागरिकत्वाची संकल्पना स्थिरावत गेली. शासनसंस्था या एकेका राष्ट्रापुरत्या विकसीत झाल्या. राष्ट्रांची परस्परांतील पृथगात्मता वाढत गेली. त्यामुळे एक व्यक्ती एकावेळी एकाच राष्ट्राची नागरिक असणे अपरिहार्य झाले. कायदेशीर दृष्ट्या नागरिकत्व ही एकेरी कल्पना आहे. मात्र हीत काही कारणांमुळे अपवाद निर्माण झाले.

**अमेरिका नागरिकत्व सुधारणा कायदा :**

अमेरिकेच्या संयुक्त संस्थानाचे संविधान संघराज्यात्मक असून राज्याचे नागरिकत्व व संघ राज्याच्याचे नागरिकत्व या दोन वेगळ्या कल्पना मानल्या गेल्या आहेत. एका राज्यातील नागरिकाला संघराज्याच्या संदर्भातही नागरिक मानले जाते पण दुसऱ्या राज्यात मात्र त्याला नागरिक मानले जाईलच असे नाही. ते राज्याच्या कायद्यावर अवलंबुन आहे.

राष्ट्रकुलातही दुहेरी नागरिकत्व आहे. ब्रिटिश साम्राज्याच्या विसर्जनाची प्रक्रिया सुरु झाली. त्यावेळी त्या साम्राज्याच्या गुलामगिरीतून मुक्त झालेली राष्ट्रे व पूर्वकालीन सम्राट इंग्लंड हे राष्ट्र याचे मिळुन राष्ट्रकुल बनले आहे. या समुहातील राष्ट्राचा नागरिक हा त्या राष्ट्राचा शिवाय राष्ट्रकुलाचाही नागरिक मानला जातो. पण राष्ट्रकुलाचा नागरिक या नात्याने फारच थोडे हक्क आहेत. जागतिक राज्याची कल्पना जेव्हा मूर्त स्वरुपात येईल तेव्हा काही काळ राष्ट्रीय आणि जागतिक असे दुहेरी नागरिकत्व चालु राहील. राष्ट्र व शासनसंस्था यांच्या कार्यकक्षा समान असल्याने राष्ट्रीयत्व व नागरिकत्व समान आहेत. असा समज होतो. जे नागरिक असतात त्यांना या देशाचे राष्ट्रीयत्व प्राप्त असतेच पण त्या देशाचे राष्ट्रीयत्व असूनही नागरिकत्व मात्र नाही अशी अवस्था तर्कतः संभवते आणि प्रत्यक्षातही आढळते.

अमेरिकेच्या कायद्यात नागरिक नसलेले राष्ट्रीय (नॅशनल) यांच्यासंबंधी तरतूदी आहेत. इंग्लंडच्या 1948 च्या राष्ट्रीयत्व अधिनियमा (नॅशनॉलिटी) प्रमाणे इंग्लंडच्या पालकत्वाखाली जे देश किंवा प्रदेश आहेत, त्यांच्या नागरिकांना इंग्लंडचे राष्ट्रीय मानले जाते, पण इंग्लंडच्या नागरिकत्वाचे अधिकार मात्र त्यांना नाहीत. काही आफ्रिकी देशांत व श्रीलंकेत जाऊन वसलेल्या काही भारतीयांना त्या देशाचे नागरिकत्व त्या त्या देशाच्या कायदेशीर मिळालेले नाही. म्हणून ते लोकही कुठलेच नागरीक नसलेले भारतीय राष्ट्रीय आहेत.

**आंतरराष्ट्रीय कायदा आणि नागरिकत्व कायदा :**

आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार पितृराष्ट्राला दुसऱ्यादेशात राहणाऱ्या आपल्या राष्ट्रीयांचय संपत्तीचा संरक्षणाविषयी कारवाई करता येते. त्या देशाने त्या राष्ट्रीयांना परत घ्या म्हणून

सांगितले तर त्यांना परत घेण्याची पितृराष्ट्राची जबाबदारी आहे आणि आपले राष्ट्रीय दुसऱ्या देशात निर्यात करण्याचा म्हणजे कायमचे पाठवून देण्याचा अधिकार कुठल्याच देशाला नाही. नागरिकत्वाहीन राष्ट्रीयांची अवस्था शोचनिय असते. त्यांना सर्वसाधारण हक्क (उदा.जीवित व वित्तीचे संरक्षण) असतात. पण राजीकय हकक (उदा.मतदानाचा,निवडणुकीचा उभा राहण्याचा इ.) कोठेच नसतात. म्हणून असले त्रिशंकुसारखे नागरिकत्वहीन राष्ट्रीय ठेवायचे नाहीत, त्यांना कुठल्या ना कुठल्या देशाचे नागरिकत्व द्यायाचे किंवा घ्यायला लावायच, अशी सध्याची प्रवृत्ती आहे. उलट साम्यवादी चीनने आपल्या देशाचे राष्ट्रीय दुसऱ्या देशात वसत असलेले व तेथील नागरिकत्व त्यांनी घेतले असले, तरही ते आपल्या म्हणजे पितृदेशाचे नागरिक आहेत असे मानले आहे. शासनसंस्थेच्या कार्यक्षेत्रात असलेल्या व्यक्ती नागरिक तरी असतात किंवा परकीय असतात.हे परकीय बहुदा दुसऱ्या देशाचे नागरिक असतात. पण वर उल्लेखिलेल्या प्रमाणे काहीच कुठलेच नागरिक नसतात. एका देशाचे नागरिक दुसऱ्या देशात कामधंद्याच्या किंवा शिक्षण, प्रवार वगैरेंच्या निमित्ताने गेलेले असतात.

काहीजण अल्पावधीत मायदेशी परततात, तर काहीजण स्थायिक होतात, पण स्थायिक झालेल्या देशाचे नागरिकत्व त्यांनी स्वीकारले नाही तर मूळ पितृदेशाचे त्यांचे नागरिकत्व चालु राहते. परकीयांना काही हक्क असतात. (उदा.जीविताचे संरक्षण इ.) पण राजकीय हक्क नसतात. परकीयांच्या पितृदेशांशी युद्ध सुरु झाले तर त्यांना परकीय शत्रु म्हणून घोषीत करण्याचा, त्याच्यावर अनेकविध नियंत्रण घालण्याचा, त्यांची संपत्ती जप्त करण्याचा किंवा गोठवण्याचा अधिकार वस्तीच्या देशाला असतो. जे परकीय शत्रु म्हणून घोषीत केलेले नसतात, ते मित्र मानले जातात.

कायद्याच्या दृष्टीने नैसर्गिक मानवी व्यक्तीप्रमाणे क्वचीत संस्थेला (उदा.कंपनी, कॉर्पोरेशन, संस्था) व्यक्ती म्हणून मानले जाते. पण कृत्रिम व्यक्तीला नागरिकत्वाचे सर्व हक्क प्राप्त होत नाहीत. किंबहुना कृत्रिम व्यक्तीला कुठले हक्क व अधिकार द्यावयाचे, याची तरतूद काही देशांनी आपल्या कायद्यात केली आहे.

**नागरिकत्वाचे स्वरुप :**

नागरिकत्व मुख्यत: जन्माने प्राप्त होते. त्या देशात किंवा त्या देशाचे नागरिक असलेल्या मातापित्याच्या पोटी जन्म होण एवढ्याने व्यक्तीला त्या देशाचे नागरिकत्व प्राप्त होते. पण नागरिकत्व बदलता येते. स्त्रीयांच्या बाबतीत त्यांनी दुसऱ्या देशाच्या नागरिकांबरोबर लग्न केल्यास त्यांचे मुळ नागरिकत्व संपते व पतीच्या देशाचे नागरिकत्व त्यांना प्राप्त होते. मात्र अलीकडे या संकेतात बदल होत असून लग्नाने स्त्रीच्या नागरिकत्वात बदल होऊ नये अशी तरतूद काही देशांनी केली आहे. प्रौढ व्यक्तीला स्वेच्छेने एका देशाचे नागरिकत्व सोडून देऊन दुसऱ्या देशाचे नागरिकत्व घेता येते पण ही सर्व प्रक्रिया त्या देशाच्या कायद्यात नमूद केलेल्या पद्धतीनुसार व्हायला हवी. नव्याने स्वीकारलेल्या नागरीकत्वाचा पुरावा दिला जात नाही. तोपर्यंत जुने नागरीकत्व त्याच्या पित्यावर अवलंबुन असते. पित्याचे नागरिकत्व बदलले, तर त्याचेही (परकीय सोडून) ही भूमिका आज मान्य झाली असली, तरी पुर्वी काही राज्यांत तशी मान्यता

नव्हती. विशेषत: ग्रीक नगरराज्यांत जे जमिनीचे मालक होते त्यांना नागरिक म्हटले जाई व जमिनीवर काम करणाऱ्या गुलाम मानले जाई. त्यांना नागरिकत्वाचे हक्क नसत. हळुहळु ही भूमिका बदलत गेली. जीविताविताचे संरक्षण, समाजजीवनाच्या विविध क्षेत्रांत भाग घेण्यास वाव, नोकरीधंद्यात प्रतिबंधाचा अभाव वगैरे हक्क सर्वांना मिळाले. परंतू राज्यकारभारात भाग घेण्याचा हक्क मात्र थोड्याच लोकांना देण्याचा आग्रह चालत राहिला.

लोकशाही राज्यव्यवस्था स्वीकारलेल्या फ्रान्स, ग्रेट ब्रिटन, अमेरिकेची संयुक्त संस्थाने यांसारख्या देशांतसुद्धा मतदानाचा हक्क संपत्ती असलेल्या नागरीकांपुरता मर्यादित होता. न्युझीलंड वगळता स्त्रियांना तर बहुतेक ठिकाणी मतदानाचा हक्क पहिल्या महायुद्धापर्यंत मिळालेला नव्हता. राज्यकारभाराची सूत्रे समजदार लोकांच्या हाती राहावीत आणि समजदार तेच की जे पुरुष संपत्तीवान आहेत अशी समजून खूप दिवस प्रभावी होती. दुसऱ्या महायुद्धानंतर मात्र बहुतेक सर्व लोकशाहीवादी देशांत, लिंग, वंश, संपत्ती वगैरे भेदांचा नागरिकांच्या समानतेवर परिणाम होऊ देण्याचे कारण नाही. अशी भूमिका मान्य झाली.

नागरिकत्व हे प्रदेशाविशिष्ट असते. एका देशात राहणारे ते नागरिक असे सर्वसाधारणपणे मानले जाते. पण याला अपवाद आहेत. हिटलरच्या काळात केवळ सेमिटिक वंशाच्या लोकांनाच नागरिकत्वाचे अधिकार होते, ज्यांना नागरिकत्व नव्हते. ब्रह्मदेशाच्या राज्यघटनेनुसार ज्यांची माता व पिता दोन्ही ब्रह्मदेशाच्या स्थानिक वंशापैकी एका वंशाचे आहेत, त्यानांच नागरिकत्वाचे हक्क मिळतात.

नागरिकत्व ही कायदेशीर संकल्पना असलेल्या बहुतेक देशांनी त्याबाबतचे कायदे केलेले आहेत. नागरिक कुणाला म्हणावे व त्या देशाचे नागरिकत्व कसे प्राप्त करुन घेता येते, याविषयीच्या तरतुदी त्यात असतात.

**काही प्रमुख देशांच्या कायद्यांची माहिती :**

अमेरिकेच्या संविधानात चौदाव्या दुरुस्तीने नागरिकत्वाविषयी तरतूद करण्यात आली आहे. त्यात दुरुस्तीच्या पहिल्या अनुच्छेदात म्हटले आहे. युनायटेड स्टेट्समध्ये जन्मलेल्या किंवा स्वीकत करुन घेतलेल्या (नॅचरलाइज्ड) आणि ते ज्या राज्यात राहतात, त्याच्याही त्या नागरिक होते.

एखाद्या नवा प्रदेश अमेरिकेत सामील झाला तर तेथील नागरिकांना अमेरिकन नागरिकत्व देण्याची तरतुद केली जाते. तसेच अमेरिकेत काँग्रेस कायदा करुन एखाद्या समूहाला नागरिकत्व देऊ शकते. ग्रेट ब्रिटनमध्ये नागरिकत्वाविषयक सर्व मुद्यांची नियमन राष्ट्रीयत्व अधिनियम 1948 या कायद्याने केले जाते.

ब्रिटिश नागरिकत्व पुढील मार्गांनी प्राप्त होते :

अ) जन्म, आ) नोंदणी इ) स्वीकृतिकरण ई) नव्या पदेशाचे सामीलीकरण, जन्माबाबत अमेरिकेसारखेच अपवाद आहेत. ऑस्ट्रेलिया हे संघराज्य असले, तरी अमेरिकेप्रमाणे तेथे दुहेरी नागरिकत्व नसून भारताप्रमाणे एकरी आहे. तेथील राष्ट्रीयत्व आणि नागरीकत्व अधिनियम 1948 (नॅशनॅलिटी अँड सिटिझनशिप अक्ट) हा ब्रिटिश कायद्यासारखाच आहे. कॅनडातही प्रतिक

नागरिकत्व वेगळ नसून सर्व संघराज्यात एकच नागरिकत्व आहे. कॅनॅडियन सिटीझनशिप 1946 अन्वये नागरिकत्व सिटिझनशिप 1946 अन्वये नागरिकत्व जन्माने किंवा नोंदणी दाखल्यानुसार मिळते. नोंदणी दाखल मिळण्याची पद्धती स्वीकृतीकरणासारखी आहे.

**ब्रह्मदेशात घटनेतच नागरिकत्व विषयी तरतुदी आहेत.** स्वीकृतीकरणासाठी **मातापिता वा आजी-आजोबा यापैकी कोणीतरी एकजण ब्रह्मी वंशापैकी असला पाहिजे, अशी अट आहे.** श्रीलंकेत नागरिकत्वाचे 1948 व 1949 असे दोन कायदे असून त्यानुसार नागरिकांचे तीन वर्ग पडतात. अ) जन्म व अनुवंशाचे प्राप्त होणारे नागरिकत्व. (आ) या कायद्यान्वये दिले जाणारे नागरिकत्व. इ) इंडियन अँड पाकिस्तानी रेसिडेंट्स 1949 अन्वये नागरिक म्हणून नोंदणी होण्यासाठी पुढीलप्रमाणे तरतूद आहे. भारतीय किंवा पाकिस्तानी राष्ट्रीय, 1 जानेवारी 1946 पूर्वी, अविवाहीत, विधवसा किंवा विधूर असल्यास 10 वर्षे व विवाहित असल्यास पत्नी आणि अज्ञान मुलांसह सात **वर्षे श्रीलंकेमध्ये राहत असले, तर त्याला श्रीलंका नागरिक म्हणून नोंदवून घेता येईल.**

पाकिस्तानात नागरिकत्व अधिनियम 1951 पासून (अ) जन्म, (आ) अनुवंश, (इ) नोंदणी, (ई) स्वीकृतीकरण व (उ) प्रदेशाचे सामीनीकरण या मार्गानी नागरिकत्व प्राप्त होते. भारतात नागरिकत्वाविषयी संविधानात अनुच्छेद 5 ते 11 अन्वये काही तरतूदी करण्यात आल्या आहेत. शिवाय अनुच्छेद 11 ने दिलेल्या अधिकारानुसार संसदेने 1955 साली नागरिकत्व अधिनियम संमत केला.

संविधानाच्या अनुच्छेद 5 अन्वये जी व्यक्ती भारतात स्थायिक असून (अ) जिचा जन्म भारतीय प्रदेशात झाला आहे किंवा (आ) जिची माता किंवा पिता भारतात जन्मलेला आहे किंवा (इ) जी घटनेच्या सुरुवातीच्या आधी किमान पाच वर्ष भारतात सर्वसाधारण वास्तव्य करीत आहे. अशा सर्व व्यक्तींना भारताचे नागरिक मानण्यात आले आहे. स्थानिक नागरिक याला कायद्याच्या परिभाषेत विशिष्ट अर्थ आहे. राष्ट्रीयत्वामुळे व्यक्तीचे राजकीय स्थान निश्चित होते. तर त्याचे नागरी स्थान ठरविण्यासाठी जो देश हा तिचे घर मानला जातो, तो देश म्हणजे तिचे स्थानिक स्थान होय. स्थानिकत्वाचा किंवा वास्तव्याचा सर्वसाधारण लौकिक अर्थ जेथे अभिप्रेत नाही, तर त्याची व्याख्या अशी जागा जिच्याशी तिचा कायदेशीर कारणांसाठी निश्चित व स्थिर संबंध आहे, मग तो तिचे घर तेथे असल्याने असो वा कायद्याने तशी तरतुद केली असल्याने असो, अशी करण्यात आली आहे.

घटनेच्या अनुच्छेद 6 ते 9 मध्ये काही अनुषंगिक तरतूदी करण्यात आल्या आहेत. देशाच्या फाळणीमुळे व लोकसंख्येच्या मोठ्या प्रमाणावरील स्थलांतरामुळे विशेष परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे इतक्या विस्तृत तरतूदी घटनेत कराव्या लागल्या.

अनुच्छेद 5 ते 9 यांचा एकत्र विचार केला असता, घटनेचा अंमल सुरू होण्याच्या वेळी पुढील व्यक्ती भारताच्या नागरिक होते.

1) भारतीय प्रदेशात जन्मलेली व स्थायिक असलेली व्यक्ती.
2) भारतात जन्मलेल्या पित्याच्या किंवा मातेच्या पोटी जन्मलेली व भारतात स्थायिक असलेली व्यक्ती.

3) जी व्यक्ती स्वत: किंवा तिचा पिता भारतात जन्मलेला नाही, पण जी भारतात स्थायिक आहे व अंमल सुरु होण्यापुर्वी पाच वर्षे भारतात राहत आहे.

4) जी व्यक्ती पाकिस्तानातून भारतात स्थलांतर करुन आली आहे.

अ) जिचे मातापिता किंवा आजी-आजोबा भारत सरकार कायदा 1935 मध्ये वर्णिलेल्या भारतीय प्रदेशात जन्मले होत अशी आणि.

आ) 19 जुलै 1948 पूर्वी ती भारतात आली असेल आणि तेव्हापासून भारतीय प्रदेशात स्थायिक असेल किंवा 19 जुलै 1948 नंतर आली असेल व भारत सरकारने नेमलेल्या विशिष्ट अधिकाऱ्यासमोर स्वत:ची नोंदणी करुन घेतली असेल.

5) जी व्यक्ती 1 मार्च 1947 नंतर भारतातून पाकिस्तानात गेली होती व भारतात स्थायी होण्याचा परवाना घेऊन जी भारतात परत आली व जिने स्वत:ची रीतसर नोंदणी करुन घेतली आहे.

6) जी व्यक्ती किंवा जिचे आईबाप वा आजी आजोबा यांच्यापैकी कोणीतरी एका व्यक्ती भारतात जन्मलेली आहे व जी त्यावेळी अन्य देशात राहत होती, पण जिने आपली नोंदणी करुन घेतली आहे.

**नागरिकत्व अधिनियम 1955 अन्वये नागरिकत्व पुढील मार्गानी मिळू शकते :**

(अ) 26 जानेवारी 1950 रोजी किंवा त्यानंतर भारतीय प्रदेशात जन्म (नेहमीचे अपवाद सोडून)

(आ) अनुवंश (भारतीय नागरिकाच्या पोटी परदेशात जन्म झाला असताना)

(इ) नोंदणी

(ई) स्वीकृतीकरण

(उ) प्रदेशाचे सामिलीकरण

(ऊ) जेथे स्पष्टता नसेल अशा प्रकरणात सरकारने नेलेल्या अधिकाऱ्याचा दाखला.

या बाबतच्या विस्तृत तरतूदी कायद्यात करण्यात आलेल्या आहेत. नागरिकत्व मिळते, तसे जे जाते ही.

भारतात ते पुढील मार्गानी जाऊ शकते. नागरिक स्वेच्छेने नागरिकत्व सोडू शकतो किंवा त्याने दुसऱ्या देशाचे नागरिकत्व स्वीकारले असेल, तर त्याचे भारतीय नागरिकत्व संपुष्टात आले असे मानले जाते. शिवाय विशिष्ट परिस्थितीत एखाद्याने नागरिकत्व भारत सरकार आपल्या हुकूमान्वये रद्द करु शकते. फसवणुकीच्या मार्गाने नागरिकत्व मिळविलेले असणे, भारतीय राज्यघटनेशी द्रोह करणे, युद्ध काळात देशद्रोह करणे, स्वीकृत नागरिकाबाबत त्याला पाच वर्षाच्या आत दुसऱ्या देशात दोन वर्षापेक्षा अधिक शिक्षा झालेली असणे किंवा विशिष्ट कारण नसतांना परदेशात सात वर्षापेक्षा अधिक वास्तव्य असणे, यासारख्या कारणांवरुन त्याचे नागरिकत्व रद्द होऊ शकते. भारतीय घटनेनुसार नागरिकाला अनेक हक्क आणि अधिकार आहेत. घटनेच्या अनुच्छेद 14 अन्वये कायद्याचे समान संरक्षण व कायद्यासमोर समानता हे हक्क कुठल्याही व्यक्तीला उपलब्ध नसेल, तरी अनुच्छेद 15, 16, 19, 30 वगैरेत नमूद केलेले मुलभूत हक्क फक्त नागरिकाला उपभोगता येतात.

शिवाय राष्ट्रपती वगैरेसारख्या पदावर निवडून जाणे किंवा संसद वा विधिमंडळ यांचे सभासद होणे, हे हक्क देखील नागरिकांपुरतेच मर्यादित आहेत.

**राष्ट्रीय नागरिकत्व दुरुस्ती विधेयक 2019 :**

'नागरिकत्व (दुरुस्ती) विधेयक 2016' याने 1955 सालच्या कायद्यात दुरुस्ती केले गेले. ज्याद्वारे या मुस्लिम देशांमधुन भारतात सीमा ओलांडून आलेल्यांना बेकायदेशीर स्थलांतरित मानले जाणार नाही. अफगाणिस्तान, बांग्लादेश आणि पाकिस्तान.

अफगाणिस्तान, बांग्लादेश आणि पाकिस्तानातुन आलेल्या बिगर मुस्लिम धार्मिक अल्पसंख्यांकांना भारताचे नागरिकत्व देण्याची तरतुद असलेले नागरिकत्व दुरुस्ती विधेयक 8 जानेवारी 2019 रोजी लोकसभेत अखेर मंजूर झाले. या विधेयकातील तरतुदी राज्यघटनेच्या विरोधात नाहीत. त्यामुळे या विधेयकास आसाममधुन होत असलेला विरोध आणि धर्माच्या आधारे नागरिकत्व देण्यास होत असलेला विरोध हा निराधार आहे. आसामच्य जनतेची परंपरा आणि सांस्कृतीचे जतन करणे ही केंद्र सरकारची जबाबदारी आहे. राज्यसभेत नागरिकत्व दुरुस्ती विधेयक 2019 संमत करण्यात आले आहे. अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि बांग्लादेशातून दि.31 डिसेंबर 2014 पुर्वी भारतात आलेल्या हिंदू, शिख, जैन, बौद्ध, ख्रिश्चन आणि पारसी या सहा मसुद्यातल्या लोकांना नागरिकत्व घेता येण्याची तरतूद या विधेयकात आहे. हे विधेयक केवळ आसाम या राज्यापुरतेच मार्यादित नाही. देशातील सर्व राज्ये आणि केंद्रशासीत प्रदेशांसाठी ते लागू राहील. या विधेयकाच्या अंतर्गत येणारे लाभार्थी देशाच्या कोणत्याही राज्यात राहु शकतील. त्यासाठी नागरिकत्व कायदा 1995 मध्ये बदल करण्यात येणार.

नागरिकत्व (दुरुस्ती) विधेयक 2019 यात अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि बांग्लादेशातून भारत आलेल्या इतक्या समुदायातल्या लोकांना नागरिकत्व घेता येण्याची तरतूद आहे. सहा (हिंदू, शीख, जैन, बौद्ध, ख्रिश्चन आणि पारसी) 124 वी घटना दुरुस्ती विधेयक 2019 मधून सर्वांना आरक्षण देण्यासाठी भारतीय घटनेच्या या अनुच्छेदात बदल केला जाणार अनुच्छेद- 15 आणि 16.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


1) भारतीय संविधान डॉ.भा.ल. भोळे
2) भारतीय शासन आणि राजकारण - डॉ.सुधाकर कुलकर्णी
3) भारतीय शासन व्यवस्था - डॉ.सुनिल दाते
4) भारतीय राज्य घटना - डॉ.बाबासाहेब आंबेडकर
5) दै.पुढारी
6) दै.लोकमत
7) इंटरनेट


***